# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/03/2023 (गुरूवार) दुपार


### गैरकायदयाची मंडळी

२) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०६ कि. मी अंतरावरील फिर्यादीचे घराचे समोर कामठी कॉलनी खदान नं. ३ येथे दिनांक ०७/०३/२०२३ चे २३.०० वा. ते २३.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— दिपचंद उमेश राउत, वय ३६ वर्ष, रा. कामठी कॉलनी खदान नं. ३ हे घराबाहेर खुर्चीवर बसले असता आरोपी क्र. १) नामे— राकेश रॉय याने विनाकारण फिर्यादीच्या खुर्चीला लाथ मारली त्यावरुन फिर्यादीने हटकले असता आरोपी क्र. १ याने शिविगाळी केली आरोपी क्र. २) नामे— दिनेश गैरवाल याने धमकी दिली व आरोपी क्र. ३) गब्बर गैरवाल व ४) शुभम गैरवाल यांनी शिवीगाळी करुन त्याचे जवळील चैनच्या लॉकेटने फिर्यादीला मारायला धावले तर आरोपी क्र. १ ते ५) नामे— शुभम गैरवाल यांनी कुऱ्हाडीच्या दंडयानी मारहाण केली. फिर्यादीचा भाऊ भांडण सोडवणेकरीता आले असता आरोपीने गैरकायदयाची मंडळी जमा करुन लाकडी दंडयाने मारहाण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला होता. आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मेश्राम हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत फिर्यादीचे राहते घर न्यु गुजरखेडी सावनेर दिनांक १६/०२/२०२३ चे १४.०० वा. ते दि. २६/०२/२०२३ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— रविप्रताप मारकंडेय पांडेय, वय ४९ वर्ष, रा. न्यु गुजरखेडी सावनेर हे त्यांचे पत्नीसह मुलाचे साक्षगंधाचे कार्यक्रमाकरीता मुळ गावी मठीया जि. गोरखपुर उत्तर प्रदेश येथे गेले असता यातील घटनावेळी व ठिकाणी यातील अज्ञात चोरांनी त्यांच्या घराचे समोरील दरवाज्याचे लॉक तोडुन बेडरूममध्ये असलेली लोखंडी आलमारीचे लॉकर मधुन १) एक सोन्याची अंगठी ४ ग्रॅम २) सोन्याचे एक जोड कानातील टॉप्स ३ ग्रॅम ३) एक सोन्याची लहान चैन ४ ग्रॅम ४) एक जोड चांदीची तोरडी व चांदीचे १० सिक्के असा एकुण ३७२००/— रूपयाचा मुददेमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक फुलेकर पोस्टे सावनेर मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर